पुणे पोलीस

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD, PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र.३०२६ दि.२०/०९/२०१९**
**चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर**
**घरफोडी चोरी करणारा पाहिजे आरोपीस अटक केलेबाबत.**

चंदननगर पो.स्टे. गु.र.नं. २०९/२०१९, भा. द. वि. कम ४५४, ३८० मधील फिर्यादी नामे बाळासाहेब सुखदेव बेनके वय-५४ वर्षे रा. स.नं. ४३/१ पठारे ठुबेनगर, लेन नं. ३, खराडी, पुणे यांनी दि. १५/०५/१९ रोजी ०९/३० वा. ते १८/०० वा चे दरम्यान दरम्यान राहता प्लॅट कुलुप लावुन बंद असताना अज्ञात चोरटयांने दरवाजाचे कुलुप व लॅचलॉक तोडुन आत प्रवेश करुन आतील बेडरुम मधील कपाटातील लॉकर मधील ३,७५,०००/- रु. किंमतीचे सोन्याचे दागिने चोरुन नेने आहे. बाबत वरीलप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचे तपासमध्ये यापुर्वी तीन आरोपी अटक केले असुन त्यांनी गुन्हयाचे तपासामध्ये पाहिजे आरोपी नामे अरुण बाबुराव शिंनगारे रा. उस्मानपुरा गल्ली नं.२, मिलींदनगर, औरंगाबाद याने सदरच गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले होते आरोपी दोन महिन्या पासुन फरार होता.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक– शंकर खटके यांचे सुचनांप्रमाणे गुन्हे प्रतिबंधक पेट्रोलिंग चालु असतांना पोना तुषार भिवरकर व पोशि सुभाष आव्हाड यांना त्यांचे बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, सदर गुन्हा करणा-या पाहिजे आरोपी नामे अरुण बाबुराव शिंनगारे रा. उस्मानपुरा गल्ली नं.२, मिलींदनगर, औरंगाबाद त्या चंदननगर भाजी मार्केट, खराडी, पुणे याठिकाणी आलेल्या आहे सदर ठिकाणी सपोनि गजानन जाधव यांचेसह गेलो असता सदर आरोपी अरुण बाबुराव शिंनगारे रा. उस्मानपुरा गल्ली नं.२, मिलींदनगर, औरंगाबाद हा मिळुन आल्याने त्यांस ताब्यात घेवुन वरील गुन्हयामध्ये दि.१८/०९/२०१९ रोजी अटक करण्यात आलेली आहे.

सदरची चांगली कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त सो, पुर्व प्रादेशिक विभाग श्री. सुनिल फुलारी सो, मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ ४, श्री अक्कानवरू सो, सहा पोलीस आयुक्त येरवडा विभाग श्री. रामचंद्र देसाई सो. यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. शंकर खटके, पो.नि.गुन्हे - सत्यवान पाटील, तपासी अमंलदार सपोनि गजानन जाधव, पोना तुषार भिवरकर व पोशि सुभाष आव्हाड यांनी केलेली आहे.